विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगांव गोवा

प्रथम सत्र परीक्षा - ऑक्टोबर २०२५

इयत्ता : अकरावी | विषय : मराठी (व्दितीय भाषा) | वेळ : ३ तास

दिनांक : ९|१०|२०२५ | गुण : ८०

सूचना : १. शुध्द्लेखनाचे नवीन नियम पाळावेत.

२. उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

## विभाग 1 - व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा.

1. कच्चा 1
2. शांत 1
3. माणूस 1

खालील शब्दांची विशेषणे लिहा.

4. रंग 1
5. समुदाय 1
6. उद्योग 1

खालील शब्दांचे विरुध्दार्थी शब्द लिहा.

7. आग्रह 1
8. मऊ 1
9. दुर्दैव 1

खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा.

10. मित्र 1

11. तरूण 1

12. राज्ञी 1

खालील शब्दांचे वचन बदलून लिहा.

13. खेळ 1

14. सावली 1

15. मासिके 1

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा.

16. आपण लाकूड किंवा त्यापासून बनणारी कागदासारखी उत्पादनं प्रचंड प्रमाणात वापरतो . 4

## विभाग 2- गद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.

17. शाळा सुटल्यावर माधवाला कोणते काम करावे लागयचे? 1

18. कथानायकाचा पाय मुरगळयामुळे तो कसा चालायचा? 1

19. पसायदानाच्या नऊ ओव्यांत ज्ञानदेवांनी काय नोंद केली आहे ? 1

खाली दिलेली वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.

20. विनोबांच्या वडिलांचे बहुतेक सगळे वागणे ________________ 1

अ. वैज्ञानिकाच्या पध्दतीप्रमाणे होते.

आ. गांधीजींच्या पध्दतीपमाणे होते.

इ. शास्त्रज्ञाच्या पध्दतीप्रमाणे होते.

21. प्रकाशकाच्या घरी कथानायक आपला ज्ञानयज्ञ ____________ 1

अ. कोपऱ्यात बसून चालू ठेवी.

आ. शेल्फावर बसून चालू ठेवी.

इ. दिवानखान्यात बसून चालू ठेवी.

22. ज्ञानदेवांनी 'ईश्वरनिष्ठ 'या शब्दाचा अर्थ ________ 1

अ. विश्वात्मक देवाची उपासना न करणारा असा घेतलेला आहे

आ. महामानव व विश्वात्मक देवाची उपासना करणारा असा घेतलेला आहे.

इ. विश्वात्मक देवाची उपासना करणारा असा घेतलेला आहे.

खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

23. " पैसे कोण तुझा बाप देणार की काय? 5

किंवा

"एका नित्यनूतन संस्कृतीचे आपण पाईकआहोत तिला कालसुसंगत नवं रुप आपणच द्यायला हवं ! "

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळीत लिहा.

24. 'योगी वडील' या पाठात वडिलांच्या मारण्याविषयी विनोबांनी कोणते विचार व्यक्त केले आहेत? 5

किंवा

लड्ढ माणूस नदीत बुडून नेला तर बरे होईल, असा दुष्ट विचार कथानायकाच्या मनात का आला ?

## विभाग 3 - पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.

25. वारकऱ्यांनी खेळ कुठं मांडलेला आहे ? 1

26. ' गोमन्तदेवी ' ही कविता कोणी लिहिली? 1

27. घराभोवती काय हवं असे कवी गोखले म्हणतात? 1

खाली दिलेली कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.

28. गोपीचंदनउटी ______ माळा । हार मिरवती गळा ॥ 1

29. या ______ भव्य पहुडशी सदा । 1

30. खळखळ वाटे बुडते घागर, ती भरल्याचा संतत ______ 1

( श्वास, प्रभावळीत, भास , तुळशीच्या)

खालील कवितेतील ओळींचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

31. वर्णाभिमान विसरली याति । एकाएका लोटांगणी जाती ॥ 5

निर्मळ चित्तें जाली नवनीतें । पाषाणा पाझर सुटती रे ॥

किंवा

परी कोरडी होती घागर, केवळ होती नाणी आत

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळीत लिहा.

32. कवी फादर स्टीफन्स यांनी मराठी भाषेची महती कशी गायिली आहे ? 5

किंवा

घराला घरपण कशामुळे लाभते, असे कवी चंद्रशेखर गोखलेंना वाटते ?

## विभाग 4 - लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य पर्याय निवडून लिहा.

33. खोल बिंबणे____________ 1

- विचारमग्न होणे
- आठवणीत राहणे
- संपविणे
- कान उघाडणी होणे

34. नाऊ लागलं म्हणून खणणे____________ 1

- अमर्याद फायदा घेणे
- ठसा उमटणे
- गुदमरून जाणे
- दिमाख वाटणे

35. तोंड गोरेमोरे होणे____________ 1

- एका दमात बोलणे
- सरळ वागणे
- सुटका झाल्यासारखे वाटणे
- लाज वाटणे

36. लक्ष वेधणे______________ 1

- डाग लागणे
- वाईट वाटणे
- आकर्षित करणे
- विचारमग्न होणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी देशवासीयांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात म्हटलं होतं, भारतीय नागरिकांना नियम मोडण्याची सवयच आहे, असं म्हटलं तर हेच नागरिक जगभर हिंडताना मात्र नियम पाळताना दिसतात. सिंगापुरमध्ये हे चुकूनसुद्धा कचरा रस्त्यात टाकत नाहीत, टोकियोत रस्त्यावर थुंकत नाहीत. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडमधील समुद्रावरील चौपाटीवर फेरफटका मारताना शहाळ्याचं पाणी पिऊन रिकामे शहाळे कचरापेटी शिवाय अन्यत्र भिरकावत नाहीत. जी मंडळी परक्या देशात कायदे, नियम इतक्या इमानेइतबारे पाळतात, तीच आपल्या देशातले नियम किती सहजपणे गुंडाळून ठेवतात! जर तुम्ही परक्या देशात जबाबदार, संवेदनशील नागरिक म्हणून वागू शकता, तर आपल्या देशातही तसं का नाही वागत? सांगू शकाल का? आमची एक वाईट खोड आहे. आम्हाला स्वच्छता हवी असते, मात्र ती म्युनिसिपालिटीनं ठेवली पाहिजे, अशी आमची अपेक्षा असते. आम्हाला सार्वजनिक बाथरूम्स, स्वच्छतागृहं नीटनेटकी स्वच्छ हवी असतात, पण ती तशी ठेवण्याची जबाबदारी आपली नसते, अशी आपली सोयीस्कर समजूत असते! थोडक्यात, नियम हे मोडण्यासाठीच असतात, अशी आपली समजूत असते यावर उपाय काय? तर आपल्या मुलांनी चांगलं वागावं ,नियम पाळावेत असं आपल्याला नक्कीच वाटत असतं. तेव्हा स्वतःला 'नागरिक' च नव्हे, पालक भूमिकेतही पहावं, म्हणजे पुढच्या वेळी रस्त्यावर केळीचं साल भिरकावताना कदाचित आपला हात थबकू शकेल !

- शिवराज गोर्ले

प्रश्न :

37. देशवासीयांना उद्देशून कोणी पत्र लिहिले आहे. ? 1

38. भारतीय नागरिक जगभर हिंडताना कशाप्रकारे स्वच्छतेचे नियम माळताना दिसतात. ? 2

39. स्वच्छतेच्या बाबतीत आम्हां भारतीयांची कोणती वाईट खोड आहे, असे लेखक सांगतात.? 2

40. 'छत्रपती उच्च माध्यमिक विद्यालय नडगांव' येथे 'गांधी जयंती' आयोजित केली आहे. या कार्य क्रमाची कार्यक्रमपत्रिका तयार करा. 5

41. 'विद्यार्थी आणि भ्रमणध्वनी' (मोबाईल) या विषयावर दोन मित्र/ मैत्रिणीमधील संवाद सुमारे 10 ते 12 ओळीत लिहा. 5

42. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे पंचवीस ओळींचा निबंध लिहा. 10

प्राणी बोलू लागले तर....

किंवा

रस्त्याचे आत्मकथन

किंवा

मी पाहिलेला क्रिकेटचा सामना

किंवा

वाढते पर्यटन व गोव्यासमोरील आव्हाने

किंवा

माझा आवडता ऋतू

—x—x—x—